

दीपावली विशेषांक
गांवकरी
जळगांव धुळे नंदुरबार
२००६
मूल्य
२०
रुपये

# खान्देशची अस्मिता





कोणत्याही भू-भागाचे स्वत:चे एक वेगळेपण असतं. तेथील लोक, भाषा, पेहराव, साहित्य, संस्कृती, उद्योग, व्यवसाय, चालीरितीनी हे वेगळेपण ठळकपणे प्रतीपादीत होते आणि ते त्या स्थानाच, विभागाच भू-भागाचं अविभाज्य अंगी बनून नसतं किंबहुना त्या वैशिष्ट्याशिवाय त्या भागाची ओळख अपुर्ण ठरते. जळगाव- धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्याची 'खान्देश' म्हणून ओळख सर्वांनाच आहे. 'खान्देश' ला स्वत:ची एक 'अस्मिता' आहे. ही 'अस्मिता' कला, शिक्षण, साहित्य, उद्योग, लोकजीवन या माध्यमातून त्या-त्या क्षेत्रातील मान्यवरांच्या शब्दात जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्या प्रांतातील वाटचाल जाणीवपूर्वक झालेले प्रयत्न, आलेल्या अडचणी आणि भविष्यात भरीव दमदार टप्पा गाठण्यासाठी करावयाच्या बाबी यावर त्यांनी प्रकाशझोत टाकला आहे.

ज्वलंत प्रश्नांवर लिखाण केल्यास 'अस्मिता' वाढीस वाव मिळतो




शंकर पुणतांबेकर



शेती आधारित कारखानदारी हीच 'अस्मिते'ची ओळख

भंवरलाल जैन

दर्जेदार प्राथमिक शिक्षणाने ध्येयवादी 'अस्मिता' जोपासली



प्रा.प्र.श्रा.चौधरी



दिव्यत्त्वाला स्पर्श करणाऱ्या सर्व कला मनुष्यनिर्मित

डॉ.मु.ब.शहा

तापी नदीच्या काठी वसलेली संस्कृती विविधांगी संपन्न आहे

प्रा.डॉ.विश्वास पाटील

## खान्देशची अस्मिता


# शेतीमाल आधारीत कारखानदारी हीच ओळख

खान्देशाला गेल्या २५ वर्षांत म्हणावा तसा राजाश्रय मिळालेला नाही. त्यामुळे साहजिकच पाहिजे तसा औद्योगिक विकास झालेला नाही. त्यातल्या त्यात शेती मालआधारित कारखानदारी हिच खान्देशच्या अस्तित्वाची ओळख आहे. पूर्वी ती कॉटन जिनिंग-प्रेसिंग, सूतगिरण्या, टेक्सटाईल अशा उद्योगांमार्फत जाणवत होती. परंतु त्यानंतर त्या व्यवसायांना एकप्रकारे खीळ बसली. कारण शेती माल खरेदीबाबत शासकीय धोरण वेळोवेळी बदलत राहिले आणि काही स्थानिक कारणांमुळे हे सर्व कारखाने मोडकळीस आले. तीच स्थिती जवळपास साखर कारखानदारीची आहे. साखर कारखाना मोडकळीस आल्याची कारणे मात्र वेगळी आहेत. बहुतांशी साखर कारखाने महाराष्ट्रातील इतर ठिकाणी ज्याप्रमाणे पुढारी लोकांच्या ताब्यात आहेत, त्याप्रमाणे येथील कारखानेसुध्दा वेळोवेळी पक्षीय राजकारणाला बळी पडले. त्यासोबत एमआयडीसीमार्फत वेगवेगळ्या क्षेत्रात कारखानदारी उभी राहिली. त्यात रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने रेमण्डचा कारखाना व त्यांचा विकास, मेरिकोचा कारखाना, एमको ट्रान्सफॉर्मर, पेट्रोलियम कंपनीच्या घरगुती गॅसचा कारखाना, पूर्वीच्या केबीएक्सचा आताचा बॉशकडे हस्तांतरित झालेला कारखाना हे महत्त्वाचे उद्योग सातत्य टिकवून आहेत. लहान-मोठे उद्योग मात्र एकूण ५०टक्याहून किंवा त्यापेक्षा अधिक आजारी किंवा बंदस्थितीत आहेत. डाळी हा शेतीआधारित दुसरा मोठा उद्योग जळगावमध्ये निर्मिला गेला. त्याचे मूळ कारण शासकीय करातील सूट किंवा विक्री दरातील सवलत हे असल्यामुळे त्यालाही पाहिजे तसे स्थैर्य प्राप्त होऊ शकले नाही. परंतु त्यातील दालपरिवार व दुसरा हे कारखाने व्यवस्थापकीय कौशल्यामुळे प्रगतिपथावर राहिले. पण त्यांच्यातही आयात-निर्यातीच्या धोरणावर त्यांची भरभराट किंवा पिछेहाट होत राहिल्याचे चित्र दिसते.

**मुंबईकडून आलेल्या उद्योगपतींची सामाजिक बांधिलकी अपुरी पडते. त्यामुळे खान्देशच्या सांस्कृतिक शैक्षणिक वाढ व विकासाविषयी कारखानदार जवळपास उदासिन आढळतात.**

थोडक्यात, जळगावमध्ये खनिज संपत्तीचा अभाव, पाण्याची विपुलता नसल्याने, विजेबद्दल इतर जिल्ह्यांप्रमाणेच हेळसांड असल्याने देशाच्या चारही कोपऱ्यांना जोडणारा चारपदरी मार्ग जळगावला जोडून जात नसल्याने औद्योगिक विकासासाठी पायाभूत समजल्या जाणाऱ्या सुविधांची उपलब्धता नसल्याने व मुंबई, पुणे, नागपूर या मुख्य औद्योगिक केंद्रांपासून हे शहर बरेच लांब पडत असल्याने येथे उद्योगांनी, कारखानदारीने म्हणावा तसा पाय रोवलेला नाही.

यातच भर पडली ती केंद्रीय किंवा राज्य पातळीवरील शासकीय किंवा निमशासकीय कारखानदारी नसण्याची. असले शासकीय कारखाने हे इतर कारखान्यांना ओढून आणण्यासाठी कारणीभूत ठरत असतात. परंतु वरणगाव व दीपनगर, अजिंठा फार्मसीला वगळता याचा लाभ आपल्या जिल्ह्याला झाला नाही. ते घडले नाही.



उद्योगपती भवरलाल जैन

नाही म्हणता जैन उद्योगसमूहाने उभे केलेले कृषी व प्लास्टिक आधारित कारखाने व त्या अनुषंगाने जळगाव शहर व जिल्ह्यात जे लहान-मोठे सुमारे ७० कारखाने उभे राहिले, ज्यात सुप्रिम इंडस्ट्रीजचाही समावेश आहे, त्यांच्या उत्पादनात मात्र गेली २५ वर्षे वाढ झाली. वाढ, विस्तार व विकास याचे सातत्य आढळते.आणि विशेष म्हणजे हा उद्योग आमच्यासारख्या खान्देशात जन्मलेल्या आणि वाढलेल्या व्यक्तींनीच उभा केलेला असल्याने त्याला स्थैर्य आणि अस्मिता त्याचे अधिष्ठान मिळाल्याचे प्रकर्षाने जाणवते. मुंबईकडून आलेले उद्योगपती यांची समाजाशी असलेली बांधीलकी अपुरी पडते किंवा नसल्यासारखे असते. त्यामुळे खान्देशच्या सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व वैद्यकीय गरजांबद्दल किंवा त्यांची वाढ, विकास होण्याबाबत असले कारखानदार जवळपास उदासीनच आढळतात.

यात मी व्यक्तिश: खान्देशची अस्मिता जागृत करण्यात आणि ठेवण्यात कुठेतरी कमी पडलो, अशीही खंत मला आहे. गेल्या २५ वर्षांपैकी सुमारे २० वर्षे मी स्वत:चाच उद्योग शून्यातून इथपर्यंत आणू/खेचू शकलो. परंतु ते करीत असतांना ओघाने ज्या कुणाला वा उद्योगाला मदत करता आली ती जरूर केलेली असली तरी, त्यासाठी

भरघोस व सातत्याचे जे प्रयत्न-कष्ट करायला हवे ते मी करू शकलेलो नाही. ते करण्यासाठी मला वेळ मिळू शकला नाही. यात नाशिकचे बोलके उदाहरण आहे. नाशिकची औद्योगिक वसाहत उभारणीसाठी जे काहींनी काम केले तसे जर मी करू शकलो असतो तर खान्देशच्या अस्मितेला जागृत करून तिला कामाला जुंपू शकलो असतो. अर्थातच, आधी लिहिलेल्या उणिवा विशेष करून मुंबईपासून लांब पडत असलेले अंतर व आधारभूत सेवेची कमतरता या कारणांमुळे नाशिकसारखे भरघोस यश येथे मिळणे शक्यच नाही. ही खंत काही अंशी कमी सुसह्य व्हावी याहष्टीने आता मी शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात तसेच जमले तर वैद्यकीय क्षेत्रात लक्षणीय काम करण्याचे योजले आहे. त्यामुळे किमान या क्षेत्रात तरी खान्देशची अस्मिता आपण जागृत करून तेवत ठेवू!

(संकलन : विजय राजहंस)

(पान ४४ वर)




दिवाळीनिमित्त आमच्या असंख्य ग्राहकांना व शहरवासीयांना हार्दिक शुभेच्छा



श्री.प्रेमचंद खिवसरा
(मा.शहराध्यक्ष, भाजपा)
महावीर बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स रामराव फकीरराव मार्केट, चाळीसगाव

दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
॥ जय महाराष्ट्र ॥

संजय संतोष पाटील



शिवसेना गटप्रमुख, पातोंडा
सदस्य, ग्रामपंचायत, पातोंडा
संचालक, स्व.मीनाताई ठाकरे ग्रा. सह. पतसंस्था, पातोंडा.
अध्यक्ष, जय भवानी मित्रमंडळ.
निवास : भवानी चौक, मुंदखेडा रोड, पातोंडा, ता. चाळीसगाव, जि.जळगाव.
☎(०२५८९) (निवास) ५२४६७

दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!




स्वर्गीय दादासो. आपणास आमच्यातून जाऊन चार वर्षे झालीत आपण आखून दिलेल्या मार्गक्रमणाने आम्ही वाटचाल करीत आहोत.

जगदंबा कृषी केंद्र, चाळीसगाव

आमचेकडे बी-बियाणे व रासायनिक खते योग्य किंमतीत मिळतील, शेतकरीपुत्राने शेतकऱ्यांच्या सोयीसाठी सुरू केलेले जगदंबा कृषी केंद्र गेल्या १० वर्षाचा प्रदीर्घ अनुभव योग्य, अचूक औषधी देणे व उत्पन्नात वाढ करणे हेच उद्दिष्ट ठेवून विश्वसनीय कृषी केंद्र - जगदंबा

प्रो.आर.डी. पाटील बोरखेडेकर



भडगाव रोड, चाळीसगाव

दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!

गेल्या ३० वर्षांपासून ग्राहकांच्या विश्वासाला पात्र राहून विश्वास संपादन करून भरपेठेत मोठ्या दिमाखाने दिलखूश सेवा, ग्राहकांचे समाधान हेच आमचे भूषण - सायरचंद जैन, चाळीसगाव

सायरचंद मोतीलाल जैन

कलात्मक दागिन्यांचे माहेरघर
१४६४, रथ गल्ली, चाळीसगाव - ४२४ ११७
दूरध्वनी - २२२४४३, २२२२३१ (घर)

दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
यंदाची दिवाळी तालुक्यातील सर्व शेतकरी, कष्टकरी व तमाम जनतेस आनंदाची जावो.
ग्रामीण भागातील जनतेसाठी अहोरात्र धडपडणारे तरुण नेतृत्व



श्री. बापूसाहेब राजेंद्र संतोष पाटील
संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, चाळीसगाव

दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!

नीलेश स्पेअर्स पॉईंट

मिनीडोअर/ॲपे/महिंद्रा चॅम्पियन/जीई १००/रिक्षा/टाटा ॲश यांचे सर्व स्पेअर पार्टस् मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण.



'शुक्रतारा' शॉ.नं.२, करगाव रोड, चाळीसगाव.
प्रो.नीलेश छोरिया
मो.नं. - 9326219346
9822524904
फो.नं. (02589) 226767

आपणास ही दिवाळी सुखं व समृध्दी तसेच आरोग्यदायी जावो हीच शुभेच्छा!

मे. राका ब्रदर्स

सरकी ढेप व पशुखाद्य विक्रेता
२६, २७, रा.फ. मार्केट, स्टेशन रोड, चाळीसगाव (जळगाव)
☎(०२५८९)दु. २२६०१७, (नि.) २२५९१७, २२२०१७
संबंधित फर्म : विशाल ट्रेडिंग कंपनी
प्रोप्रा. दिलीप राका, नरेंद्र राका

दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
स्वच्छ व मुबलक पिण्याचे पाणी शासकीय योजनेचा संपूर्ण जनतेला लाभ
स्वच्छ व सुंदर गाव हेच आमचे ध्येय !



श्री.विजय मुरलीधर सोनवणे
(सरपंच)

श्रीमती मुक्ताबाई संतोष अहिरे ( उपसरपंच)
सदस्य - श्री.भिकन वना देवरे, श्री.रमेश संतोष महिरे, श्री.दगडूशहा बन्नूशहा फकीर, श्री.प्रभाकर रंगराव पाटील, श्री. प्रकाश नथ्थू चौधरी, श्री.वाल्मीक रामचंद्र माळी, श्री.दगडू लक्ष्मण इंगळे, श्रीमती हिराबाई कृष्णा माळी, श्रीमती इंदूबाई हिरामण पाटील, श्रीमती जिजाबाई भीमराव हाडपे, श्रीमती गोमताबाई बापू भील, एल.पी. राठोड (ग्रामविकास अधिकारी), भास्कर गोबजी सोनवणे (लिपिक)

दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा

कासोदा व परिसरातील आमच्या असंख्य ग्राहकांना हर्षल रेस्टॉरंटकडून दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक



श्री.बळीराम तंगा वारे (चांभार)
संचालक - राजाभाऊ मंत्री ग्रा.बि.शेती पतसंस्था कासोदा, ता.एरंडोल, जि.जळगाव
टीप :- दूध, चहा, कॉफी मिळण्याचे एकमेव ठिकाण. हर्षल रेस्टॉरंट बिर्ला चौक, कासोदा, ता.एरंडोल.

जाहिरात संकलन - जितेंद्र ठाकरे, कासोदा